**<u>सं.फौ.ख.क्र.११७९/२०२४</u>**
शासन–वि–हनुमंत व इतर
**नि.क्र.१७.**

## <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – नवनाथ नेमचंद पहाणे,
वय – ४२ वर्षे, व्यवसाय – चालक,
राहणार– काळेवाडी, ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आंधळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. मी एस. के. कटारीया स्कूल काळेवाडी यांच्या शाळेच्या बसवर चालक म्हणून काम करतो. मी आरोपींना ओळखत नाही. दि. ०९.०२.२०२४ रोजी दुपारी ३.४५ च्या दरम्यान गाडी लावण्याच्या कारणावरुन माझा आरोपीशी किरकोळ वाद झाला होता. त्यावेळी शुभांगी गायकवाड आणि सोनाली गिरमकर या शिक्षिकांना शिवीगाळ झाली असे काही घडले नव्हते. त्यावेळी माझ्या गाडीचे नुकसान झाले नव्हते. किरकोळ वाद झाल्यामुळे मी आरोपीविरुध्द फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्यादीवरील सही माझी आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. फक्त सहीस **<u>नि.१८</u>** देण्यात येते. तसेच आता मला दाखविण्यात आलेल्या छापील खबर वरील सही माझी आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. फक्त सहीस **<u>नि.१९</u>** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास पाठिंबा देत नसल्याचे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी नमुद केले व साक्षीदारास उलटतपासणी सदृष्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी दौंड पोलीस स्टेशन येथे जाऊन स्वतः आरोपीविरुध्द फिर्याद दिली की, दि. ०९.०२.२०२४ रोजी बस घेऊन जात असताना आरोपीने माझ्या गाडीला कट मारला आणि दोघेजण माझी गाडी थांबवून गाडीत शिरले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी गाडीत शिरुन मला मारहाण केली आणि सोबत असलेल्या शाळेतील शिक्षिका शुभांगी गायकवाड आणि सोनाली गिरमकर यांना शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने त्यावेळी दगड उचलून माझ्या गाडीच्या काचेवर मारुन गाडीचे नुकसान केले. पोलिसांनी माझ्या फिर्यादीतील **<u>आधोरेकित भाग अ</u>** चा मजकूर लिहील्याचे कारण सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आणि आरोपीची तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तडजोड झाल्यामुळै आरोपीला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. बी. गिरमकर यांनी नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः- २०.०२.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.